# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# देसाई कॉलेजमध्ये राष्ट्रीय चर्चासत्रास प्रतिसाद

## चार जिल्ह्यातील ७५ महाविद्यालयीन व तालुक्यातील २२ ग्रंथपालांचा चर्चासत्रात सहभाग

**वार्ताहर**
पाटण

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या परीसस्पर्श योजनेतून 'नॅक मूल्यांकनामध्ये लायब्ररीचे योगदान' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र नुकतेच उत्साहात संपन्न झाले.

दोन सत्रामध्ये आयोजित या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन व बीजभाषण शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील बॅ. बाळासाहेब खर्डेकर नॉलेज रिसर्च सेंटरचे इनचार्ज डायरेक्टर डॉ. धनंजय सुतार यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. पवार, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ.सी. एच. व्ही. काटे, संजय इंगवले, प्रा. ए. व्ही.देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



पाटण : राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना डॉ. धनंजय सुतार. समवेत संजीव चव्हाण, प्राचार्य एस. डी. पवार, डॉ. शांताश्री सेनगुप्ता, डॉ. शिवाजीराव कांबळे व इतर.

डॉ. शांताश्री सेनगुप्ता यांनी 'नॅक मूल्यांकनामध्ये ग्रंथालय सेवकांची जबाबदारी' याविषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. शिवाजीराव कांबळे यांनी 'नॅक मूल्यांकनामध्ये ग्रंथालयाचे महत्व व जबाबदारी' यावर सखोल मार्गदर्शन केले.चर्चासत्रात नॅक मूल्यांकनामध्ये ग्रंथालय सेवकांची जबाबदारी व कामाची पूर्वतयारी, ग्रंथालयांचे आधुनिकीकरण, नॅकच्या दहा निकषांमध्ये झालेले बदल, महाविद्यालयीन ग्रंथालयांबरोबरच सार्वजनिक ग्रंथालयाच्या असणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात व महाविद्यालयीन व सार्वजनिक ग्रंथालयामध्ये समन्वय राहावा यासाठी विद्यापीठांनी प्रयत्न करावेत आदी विषयावर चर्चासत्र झाले.

या राष्ट्रीय चर्चासत्रात सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ७५ महाविद्यालयीन तसेच पाटण तालुक्यातील २२ सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपालांनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय चर्चासत्र पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. अनिल पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. डॉ. विनायक राऊत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. प्रशांत फडणीस यांनी आभार मानले. सदर राष्ट्रीय चर्चासत्रासाठी चार जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील ग्रंथपाल व ग्रंथालयीन सेवक उपस्थित होते.